नि.दि.दा.क्रं. २४२/२०२२
कमल उर्फ कमलाबाई -वि-
विश्वंभर व इतर

**आदेश नि.क्रं.३४**

(पारीत दिनांक ०५ माहे फेब्रुवारी सन २०२६)

सदरहु अर्ज वादीने दाव्यामध्ये प्रस्तावीत दुरुस्ती आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत दाखल केलेला आहे.

**२.** सदरहु अर्ज व त्यावरील दाखल प्रतिवादीचे उत्तर (निशाणी क्र.३८) वाचले आणि संपूर्ण अभिलेख पाहिला. वादी व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारा केला असता गैरहजर. प्रतिवादीचे वकीलांनी सदर अर्जावरील त्यांचे म्हणणे हेच त्यांचा युक्तीवाद ग्राहय धरण्यात यावा असे तोंडी सांगितले. सबब, सदरहू अर्ज गुणवत्तेवर निकाली काढत आहे.

**३.** वादीला दाव्यामध्ये काही वडीलोपार्जीत मालमत्ता व प्लॉट वादसंपत्तीमध्ये नमूद करण्याकरीता, ती संपत्ती त्यांची वडीलोपार्जीत संपत्ती असल्याचे आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांनी बेकायदेशीर हस्तांतरण केलेली संपत्ती वादीवर बंधनकारक नाही, प्रस्तावित प्रतिवादी क्र.१० यांना पक्षकार म्हणून सामील करण्याचे इत्यादी प्रस्तावित दुरूस्ती करायची आहे. सदरहू दुरुस्तीमुळे त्यांच्या दाव्याचे स्वरूप बदलत नाही. तसेच प्रतिवादीला कोणताही अपाय होणार नाही, असे कथन केले आहे.

**४.** याउलट प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, दोन्ही प्रार्थना एकाच अर्जात वादीला करता येत नाही. वादमिळकत वडीलोपार्जीत असल्याचे कोणतेही दस्त सोबत जोडले नाही. वास्तविक पाहता, मालमत्ता क्र.५० व ८९ ह्या त्यांच्या वडीलांच्या स्वयं संपादित मालमत्ता होत्या आणि त्यांच्या वडीलांनी सन २००१ मध्येच त्याची विल्हेवाट लावलेली आहे. वादीने वादपत्रामध्ये दाव्याच्या आकारणीमध्ये मुल्यांकनाबाबत दुरूस्ती मागितलेली नाही. प्रस्तावित दुरूस्तीनुसार चुकीच्या गावाची नावे नमूद केलेली आहेत. सदरचा अर्ज दावा लांबविण्याकरीता केलेला आहे. सध्या स्थीतीला वादी अशी दुरुस्ती करुन शकत नाही. तशी दुरूस्ती कायदयाला अभिप्रेत नाही. त्यामुळे सदरचा दुरुस्ती अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीला दाव्यामध्ये काही वडीलोपार्जीत मालमत्ता व प्लॉट वादसंपत्तीमध्ये नमूद करण्याकरीता, ती संपत्ती त्यांची वडीलोपार्जीत संपत्ती असल्याचे आणि प्रतिवादी क्र.१ व २

यांनी बेकायदेशीर हस्तांतरण केलेली संपत्ती वादीवर बंधनकारक नाही, प्रस्तावित प्रतिवादी क्र.१० यांना पक्षकार म्हणून सामील करण्याचे इत्यादी प्रस्तावित दुरूस्ती करण्याबाबत चा अर्ज असल्याचे दिसून येते. सदर अर्जाद्वारे वादीने एकदाच संपूर्ण प्रस्तावित दुरूस्तीची मागणी करणे अपेक्षीत आहे. परंतू वादीने प्रस्तावीत दुरूस्तीद्वारे दाव्याच्या आकारणीमध्ये वादसंपत्तीच्या मुल्यांकनाप्रमाणे होणा-या बदलाबाबत प्रस्तावित दुरूस्ती करणे अपेक्षित असताना तशी दुरूस्तीची मागणी सदर अर्जात केलेली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज प्रामाणिक हेतुने केलेला दिसून येत नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (निशाणी क्र.३४) फेटाळण्यात येतो.

२. वादीला पुन्हा नव्याने योग्य ती संपूर्ण प्रस्तावित दुरूस्ती करण्याबाबतचा अर्ज सादर करण्याची मुभा देण्यात येते.

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE

Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.02.05 16:53:32 +0530

(के.एस. खंडारे)

दि. ०५.०२.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कंधार